




दैनिक
# मराठवाडा पत्र

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे

•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १४४ •रविवार, दि. २४ ऑगस्ट २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955







# मनोज जरांगे पाटलावर खालच्या भाषेत बोलणाऱ्या लक्ष्मण हाकेंची जीभ हसडणाऱ्याला एक लाखांचे बक्षीस

## • पाटील समर्थक गंगाधर काळकुटे ; ओबीसी – मराठा वाद पेटण्याची चिन्हे !
## • मराठा आरक्षणाला काउंटर करण्यासाठी ओबीसी संघर्ष यात्रा !

**बीड । प्रतिनिधी**

मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्यावर खालच्या भाषेत टीका करणाऱ्या लक्ष्मण हाके यांनी तोंड सांभाळून बोलावे नसता त्यांची जीभ हासडणाऱ्याला एक लाख रुपयांचे बक्षीस देणार असल्याचे मनोज जरागे पाटील समर्थक गंगाधर काळकुटे यांनी जाहीर केले आहे. मराठा समाजाचे ओबीसी समाजासोबत कोणतेही वैर नाही, ही लढाई शासनाच्या विरोधात असल्याने ओबीसी बांधवांनी सहकार्य करण्याची भूमिका घ्यावी या प्रकरणात ओबीसी नेते, लक्ष्मण हाके हे मनोज जरांगे पाटील यांच्यावर खालच्या पातळीवर बोलत आहेत. व प्रति मोर्चे काढण्याची भाषा करत असल्याने मनोज जरांगे समर्थक कमालीचे नाराज झाले आहेत यापुढे



खालच्या भाषेत मनोज जरागे यांच्यावर टीका केल्यास लक्ष्मण हाके यांची जीभ हासडण्यात येईल असे मनोज जरांगे पाटील समर्थक गंगाधर काळकुटे यांनी म्हटले असून येणाऱ्या २९ ऑगस्ट पर्यंत राज्यात पुन्हा मराठा ओबीसी वाद निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या दरम्यान लक्ष्मण हाके म्हणाले, आरक्षणाच्या लढायची पुढील दिशा आणि स्वरूप ठरवण्यासाठी बैठक असल्याचे हाके म्हणाले. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यामध्ये आम्ही बैठक घेत आहोत. ओबीसींची संघर्ष यात्रा निश्चित काढली जाणार आहे. लवकरच याबाबतचा निर्णय जाहीर केला जाणार आहे. कोणीतरी मुंबईला जात आहे आणि यंत्रणा वेठीस धरत आहे. मात्र आम्ही तसे

▶▶ उर्वरित पान २ वर

### • प्रशासनाने काळजी घेण्याची गरज

यापूर्वी मराठा आरक्षण आंदोलन अत्यंत हिंसक झाले होते या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने २९ ऑगस्ट पूर्व राज्यातील परिस्थितीवर नियंत्रण ठेवायला हवे. राज्यातील परिस्थिती बिघडू नये यासाठी कोणीही अक्षयपार्य वक्तव्य करू नये याची गंभीर दखल प्रशासनाने घेत आरक्षणाची लढाई शांततेने कशी होईल याकडे लक्ष देणे आवश्यक झाले असून येणाऱ्या सहा दिवसात राज्यात पुन्हा मराठा आरक्षणाचे आंदोलन होणार असल्याने याकडे राज्य शासनाने गांभीर्याने पाहायला हवे.

### • बीड जिल्हा ठरतोय केंद्रबिंदू !

मुंबई आरक्षणाच्या लढाईसाठी अंतिम बैठक बीड तालुक्यातील मांजरसुंबा येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीमध्ये आंदोलनाची दिशा ठरवण्यात येणार असल्याने मुंबई येथे होणाऱ्या मराठा आरक्षणाचा केंद्रबिंदू बीड जिल्हा ठरत आहे. यापूर्वीही मराठा आरक्षणा आंदोलनादरम्यान बीड येथील नेत्यांची व आमदारांची घरे जाळण्यात आली होती. मात्र ही जाळपोळ मराठा आंदोलकांनी केली नसल्याचे सांगण्यात आले होते. काही आंदोलनाला बदनाम करणाऱ्या लोकांनी हे कृत्य केले असल्याचे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले होते. मांजरसुंबा बैठकीनंतर मुंबई येथे कूच करण्यासाठी पुढील दिशा ठरवण्यात येणार आहे राज्यातील मराठा आरक्षणाचा केंद्रबिंदू बीड जिल्हा ठरत असल्याने राज्याचे लक्ष बीड जिल्ह्याकडे लागलेले आहे.

## बीडचे भूमिपुत्र तथा सुप्रसिद्ध अभिनेते मिलिंद शिंदे यांना सावित्रीबाई फुले विद्यापीठाची पीएचडी प्रदान

### • सर्व स्तरातून होतोय अभिनंदनाचा वर्षाव

**बीड । प्रतिनिधी**

मराठी चित्रपट सृष्टीतील अनुभवी अभिनेते बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र मिलिंद रामदास शिंदे यांना सावित्रीबाई फुले विद्यापीठातून पीएच डी ही पदवी प्रदान करण्यात आली. पीएचडी मिळाल्या बद्दल अभिनेते मिलिंद शिंदे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. मराठी चित्रपट सृष्टीतील अनुभवी अभिनेते तथा बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र श्री मिलिंद रामदास शिंदे यांचे पाटोदा तालुक्यातील निरगुडी हे मूळ गाव आहे. त्यांचे वडील रा.जा. शिंदे हे बीड जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पबचत अधिकारी पदावर कार्यरत होते. पुढे त्यांनी कायद्याची पदवी घेऊन अहमदनगर येथील जिल्हा



न्यायालयात वकिली व्यवसाय सुरू केला होता. दरम्यान अभिनेता मिलिंद शिंदे हे अनेक वर्ष बीडच्या बीअँड सी क्वार्टर मध्ये वास्तव्य करत होते. त्यामुळे त्यांना बीड जिल्ह्यासह बीड

▶▶ उर्वरित पान २ वर

## बीडचे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे विलास मस्केवर मध्यरात्री अज्ञातांकडून घरातघुसून प्राणघातक हल्ला

### विलास मस्के यांच्यासह त्यांच्या बहिणीवर पाच ते सहा हल्लेखोरांनी घरात घुसून रॉड, हत्याराणे केले डोक्यात, हातावर गंभीर स्वरूपाचे वार ; मस्के यांच्यावर झालेल्या हल्ल्यामुळे पालवन गावामध्ये तणावाचे वातावरण

**बीड । प्रतिनिधी**

सध्या बीड मध्ये गुन्हेगारीचे प्रमाण अधिकच वाढत चाललेले दिसून येत आहे. जिल्ह्यात अनेक ठिकाणी गुन्हेगारीने तोंड वरी काढलेले असून. बीडमध्ये गुन्हेगारीचे सत्र चालूच दिसून येत आहे. पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी मोडून काढण्यासाठी कठोर पाऊल उचलले असले तरी बीडमध्ये अनेक भागांमध्ये गुन्हेगारीचे सत्र चालूच दिसत आहे. असाच एक प्रकार काल रात्री पालवन गावात घडला आहे. पालवन गावातील रहिवाशी असलेले शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, तसेच युवासेनेचे बाजीराव चव्हाण यांचे ऑफिस मधील काम पाहणारे विलास मस्के यांच्यावर रात्री एकच्या सुमारास दाराची कडी वाजवत तोंडाला बांधलेल्या अवस्थेतील पाच ते सहा अज्ञातांनी मस्के यांच्यावर रॉड आणि हत्याराणे डोक्यात आणि हातावर गंभीर स्वरूपाचे वार केले आहेत. जेव्हा हल्लेखोर विलास मस्के यांच्या अंगावर तुटून पडले. तेव्हा घरात असलेल्या त्यांची बहीण हल्ल्यातून मस्के यांना वाचवण्यासाठी पुढे आल्या. तेव्हा त्यांच्यावर देखील

▶▶ उर्वरित पान २ वर



## आज इम्तियाज जलील यांची जाहीर सभा

**तलवाडा । प्रतिनिधी**

माजलगाव शहरात एमआयएम पार्टीच्या वतीने 'हालात-ए-हजरा' कार्यक्रम ठेवण्यात आला आहे. यानिमित्त रविवार दि. २४ रोजी संध्याकाळी ७ वाजता आंबेडकर चौक, (चुंनुमा चौक) येथे आयोजित जाहीर सभेस माजी खासदार इम्तियाज जलील यांचे

▶▶ उर्वरित पान २ वर

## तलावात बैल धुण्यासाठी गेलेल्या वृध्द सालगड्याचा पाण्यात बुडून मृत्यू

### • तीस तासानंतर मृतदेह सापडला

**तलवाडा । प्रतिनिधी**

महाराष्ट्रात परंपरेनुसार बैलपोळा सण शेतकरी राजा



मोठ्या आनंदात उत्साहात साजरा करतो वर्षभर राब राबणाऱ्या बैलाची खांदे मांडणी व संजावट करून बैलपोळा साजरा करण्यात येतो. गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील भेंडटाकळी येथील शेतकरी मोहन वैशिष्ट लोंढे यांच्याकडे सालाने ठेवलेल्या गडी बिभिषण सुदाम लोंढे (वय वर्षे ५२) बैलाला पोळ्यानिमित्ताने दिं. २२ रोजी - सकाळी आठच्या सुमारास भेंडटाकळी सिंचन तलावात गेला होता ६० ते ७० एकरचा असलेल्या सिंचन आहे . तलावात

▶▶ उर्वरित पान २ वर

## शिक्षक – शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना उच्च न्यायालयाचा दिलासा निषेधाचे पत्र ही 'बदनामी' नव्हे

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

कामाच्या ठिकाणी वरिष्ठांकडे सादर केलेले निषेधाचे निवेदन हे बदनामीच्या खटल्यास कारणीभूत ठरू शकत नाही' असा निर्वाळा मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दिला आहे. शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालय,




संभाजीनगर येथील सेवानिवृत्त प्राध्यापिका चंद्रज्योती मुळे - भंडारी व अन्य तेवीस शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी दाखल केलेल्या फौजदारी अर्जात न्या. कीशोर संत यांनी उपरोक्त आदेश दिला. महाविद्यालयातील सहकारी प्राध्यापकाने दाखल केलेल्या

▶▶ उर्वरित पान २ वर

## पुण्यात पत्नीकडून पतीला लिव्हर दान; ऑपरेशन झालं, पण ८ दिवसांत दोघांचा शेवट; रुग्णालयावर गंभीर आरोप

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातून अतिशय हृदयद्रावक, धक्कादायक घटना समोर आली आहे. पुण्यातील एका पती-पत्नीवर केलेली लिव्हर ट्रान्सप्लांटची शस्त्रक्रिया दोघांच्याही जिवावर बेतली आहे. लिव्हर ट्रान्सप्लांट शस्त्रक्रियेनंतर



पती आणि पत्नी दोघांचाही मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना पुण्यातील एका रुग्णालयात समोर आली आहे. पुणातील डेक्कन परीसरातील प्रसिद्ध रुग्णालयामध्ये पती पत्नीचं लिव्हर ट्रान्सप्लांट करण्यात आलं होतं. पण या शस्त्रक्रियेनंतर दोघांचाही मृत्यू झाला.बापू बाळकृष्ण कोमकर आणि कामिनी बापू कोमकर असं मृत्यू झालेल्या पती -

▶▶ उर्वरित पान २ वर

## बीडच्या अर्धपीठ शनी मंदिरात श्रावणी शनी अमावस्येनिमित्त भाविकांची तुडुंब गर्दी

### • मध्यरात्री १२ पासुन भक्तांनी दर्शनासाठी लावल्या रांगा

**बीड । प्रतिनिधी**

आज श्रावणी शनि अमावस्येनिमित्त बीड येथील अर्ध पीठ शनी मंदिरात भाविकांची तुफान गर्दी पाहायला मिळाली. मध्यरात्रीच्या




बारा वाजल्यापासूनच मंदिर परिसरात दर्शनासाठी भक्तांची रीघ लागलेली होती. 'शनी महाराज की जय' च्या घोषणांनी संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भरून गेला होता. या पवित्र दिवशी दर्शनासाठी आलेल्या भक्तांसाठी मंदिर प्रशासनाने चोख व्यवस्था

▶▶ उर्वरित पान २ वर

## संस्था चालकाच्या छळाला कंटाळून तरुणाने घेतला गळफास

### परळी पोलिस ठाण्यात संस्थाचालकावर गुन्हा दाखल



**बीड । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील नंदागौळ येथील रहिवासी श्रीनाथ गोविंद गिते (वय २५) या तरुणाने शुक्रवारी (२२ऑगस्ट २०२५) राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. तो नुकताच वसंतनगर येथील आश्रमशाळेत अनुकंपा तत्त्वावर 'सेवक' म्हणून रुजू झाला होता. यापूर्वी तो केज येथील एका निवासी शाळेत बारा वर्षांपासून चतुर्थश्रेणी कर्मचारी म्हणून काम करत होता, मात्र त्याला कायम करण्यात आले नव्हते.

परंतु आईने पाठपुरावा करत व सामाजिक कार्यकर्ते टायगर ग्रुप जिल्हा अध्यक्ष राकेश जाधव यांनी समाज कल्याण अधिकारी यांची भेट घेऊन संस्थेवर रुजू करून घेण्यात यावी अशी मागणी केली होती,अन्यथा त्या संस्थाचालका विरोधात

▶▶ उर्वरित पान २ वर

## मौजे आहेरधानोरा वरवटी येथील दारू बंद करण्यासाठी महिलांचे उपमुख्यमंत्री अजित दादांना निवेदन

### महिला सरपंच सौं. मोनिका इंगोले यांचा पुढाकार






**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील मौजे आहेर धानोरा गावामध्ये देशी विदेशी दारूमुळे गावातील तरुण वर्ग व्यसनाधीश झाला असून गावा त अवैधपणे दारू विक्री वाढली आहे यामुळे शाळेत जाताना विद्यार्थ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. गावातील दारू आडवी करण्यासाठी सरपंच सौं. मोनिका बालासाहेब इंगोले यांच्या नेतृत्वाखाली महिलांनी उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांना दारू आडवी करण्यासाठी निवेदन दिले आहे. मौजे

▶▶ उर्वरित पान २ वर

## डोळ्यात चटणी टाकून वडिलांना मारहाण; मुलावर गुन्हा दाखल

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

कौटुंबिक वादातून मुलाने वडिलांच्या डोळ्यात चटणी टाकून त्यांना मारहाण केल्याप्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना अंबाजोगाई तालुक्यातील राडी तांडा येथे घडली असून फिर्यादी संजय जयराम चव्हाण (वय ४५, रा. राडी तांडा, अंबाजोगाई) यांनी

▶▶ उर्वरित पान २ वर




# जरांगेंच्या भगव्या वादळाचा मार्ग ठरला! मुंबईत कसं धडकणार? वाचा संपूर्ण 'प्लॅन'

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील पुन्हा एकदा आक्रमक झाले आहेत. राज्यभरातील मराठा समाजाच्या हजारो बांधवांना घेऊन ते येत्या २९ ऑगस्ट रोजी मुंबईत मोर्चासह धडकणार आहेत. या मोर्चात मोठ्या संख्येने आंदोलक सहभागी होण्याची शक्यता आहे. विशेष म्हणजे या काळातच मुंबईत गणेशोत्सवाची धूम सुरू असणार असल्याने प्रशासनासमोर मोठं आव्हान उभं राहणार आहे.

मनोज जरांगे यांचा मोर्चा २७ ऑगस्ट रोजी जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथून निघणार आहे. दोन दिवसांच्या प्रवासानंतर ते २९ ऑगस्ट रोजी रात्री मुंबईच्या आझाद मैदानावर पोहोचतील. त्यांच्या या प्रवासात हजारो मराठा बांधव सहभागी होणार असल्याचं चित्र आहे.

जरांगे पाटलांचा मुंबईकडचा नेमका मार्ग : २७ ऑगस्ट : अंतरवाली सराटी फशहागड फाटा फसाष्ट पिंपळगाव फआपेगाव फपैठण कमान फघोटण फशेवगाव फमिरी नाका फपांढरी पुल फ अहिल्यानगर बायपास फनेप्ती चौक फआळाफाटा फशिवनेरी किल्ला (येथे मुक्काम)

२८ ऑगस्ट : शिवनेरी किल्लयावर दर्शन फ राजगुरुनगर फ खेड फ चाकण फ तळेगाव फ




लोणावळा फपनवेल फवाशी फचेंबूर फमुंबई आझाद मैदान या मार्गावर प्रत्येक ठिकाणी मराठा समाजाकडून जरांगे यांच्या स्वागताची जोरदार तयारी केली जात आहे.

राज्यभरात जोरदार तयारी : मोर्चाच्या पार्श्वभूमीवर ग्रामीण व शहरी भागात 'चलो मुंबई' अशी हाक दिली जात आहे. गावोगावी चावडी बैठका घेऊन समाजबांधवांना मुंबईला हजेरी लावण्याचे आवाहन केले जात आहे. धाराशिव, मराठवाडा, विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्र या भागातून मोठ्या प्रमाणावर मराठा बांधव मुंबई गाठणार आहेत. मुंबईतील आझाद मैदानावर या मोर्चाचा मुख्य कार्यक्रम होणार असून, प्रशासनाने कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांची मोठी फौज तैनात करण्याची तयारी सुरू केली आहे.

जरांगे यांचा सरकारला इशारा : मनोज जरांगे पाटील यांनी स्पष्ट केले आहे की, मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळालेच पाहिजे. सरकारने २६ ऑगस्टपर्यंत ठोस निर्णय घेतला नाही, तर २७ ऑगस्टला आम्ही मुंबईकडे रवाना होऊ. २९ ऑगस्ट रोजी हजारोंच्या संख्येने मराठा बांधवांसह आझाद मैदानात धडकू. त्यामुळे राज्य सरकारसमोर मोठं आव्हान उभं राहिलं आहे. एकीकडे मुंबईत गणेशोत्सवाची तयारी असताना दुसरीकडे मराठा आरक्षणाचा मोर्चा यामुळे शहरातील वाहतूक व्यवस्था आणि सुरक्षेवर ताण येणार आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## मनोज जरांगे...

करणार नाही. मुंबईतील कायदा व सुव्यवस्था बिघडण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला. तुम्ही मंत्र्यांना अंतरवालीत बोलून घ्या. मुंबईत दंगली घडवायला चालले आहात का? असा सवाल हाकेंनी मनोज जरांगेंना केला. मुख्यमंत्र्यांना टार्गेट करणे हा त्यांचा अजेंडा आहे. जे घडत आहे. ते बेकायदा घडत आहे. सर्वोच्च न्यायालयाने जो निवाडा दिला त्याच उल्लंघन तुम्ही करत असल्याची टीका लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगेंवर केली. यावेळी बोलताना लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगेंवरही निशाणा साधला. मनोज जरांगेंना आरक्षणातील किती कळते? असा सवाल करत, आरक्षणाचे अधिकार आयोगांना असतात. ज्या जातींचा ओबीसीत समावेश केला जातोय. त्या ओबीसीतील उपजाती आहेत, असे हाके म्हणाले. ओबीसीत नव्याने जाती सामील केल्या आहेत, असे काही नाही. मनोज जरांगे यांना यातील कळत नाही. ज्यांना कळते त्यांनी पुढे यावे. आरक्षण कुणालाही दिले जाते नाही. जी जात मागे पडते तिला पुढे आणण्यासाठी आरक्षण दिले जाते, त्यात तुम्ही बसतच नाहीत, असेही हाके म्हणाले. यादरम्यान मनोज जरागे पाटलावर सतत टीका करणाऱ्या लक्ष्मण हाके याना पाटील समर्थक असणारे गंगाधर नाना काळकुटे यांनी थेट आव्हान दिले आहे. मराठा आरक्षणाबद्दल तसेच मनोज जरागे पाटील यांच्या बद्दल खालच्या भाषेत यानंतर बोलल्यास लक्ष्मण हाके यांची जीभ हासडणाऱ्याला एक लाख रुपयांचे बक्षीस काळकुटे यांनी जाहीर केले. मुंबई येथील मराठा आरक्षण आंदोलनाची तयारी पूर्ण झाली असून आरक्षणाच्या व आंदोलनाच्या तयारीसाठी बीड येथील मांजरसुंबा येथे मनोज जरांगे पाटील समर्थकांची अंतिम बैठक होणार आहे. मुंबई आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी राज्यात ओबीसी संघर्ष यात्रा काढणार असल्याचे जाहीर केले आहे. मराठा आरक्षण आंदोलनाला काउंटर करण्यासाठी लक्ष्मण हाके ओबीसी संघर्ष यात्रा काढत असल्याची टीका मनोज जरांगे पाटील समर्थकांनी केली आहे.

## बीडचे भूमिपुत्र...

शहराची खडा ना खडा माहिती आहे. अभिनयाची आवड असल्याने मिलिंद शिंदे यांनी नाटकाच्या माध्यमातून चित्रपट दुनियामध्ये पदार्पण केले. कसदार अभिनयातून त्यांनी मराठी रंगभूमी आणि चित्रपट सृष्टीत आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवीला. 'झुलवा' ती फुलराणी, कथा अरुणांची, यासारख्या अनेक गाजलेल्या नाटकापासून ते नटरंग, पारध, नॉट ओन्ली मिसेस राऊत, या चित्रपटात त्यांची व्यक्तिरेखा प्रेक्षकांना खूप भावली. त्यांच्या अभिनयाला प्रेक्षक मायबापांनी नेहमीच दाद दिली आहे. छोट्या पडद्यावरही 'तू तिथे मी' आणि 'देव माणूस' आदी मालिका मधील त्यांच्या भूमिका संस्मरणीय आहेत. अभिनेते विजय तेंडुलकर यांच्या नाटकातील 'स्त्री भूमिका' या विषयावर अभिनेता मिलिंद शिंदे यांनी सावित्रीबाई फुले विद्यापीठात पीएचडीसाठी प्रबंध सादर केला. त्या बद्दल त्यांना नुकतीच मान्यवरांच्या हस्ते पीएचडी पदवी मोठ्या शानदार सोहळ्यामध्ये प्रदान करण्यात आली. अभिनेते मिलिंद शिंदे यांना पीएचडी पदवी मिळाल्याबद्दल बीड जिल्ह्यात सह राज्यभरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## बीडचे शिवसेना...

या हल्लेखोने त्यांच्या हातावर वार केला आहे. या हल्यात त्या देखील गंभीर जखमी झाल्या आहेत. हल्ला झाल्या वेळी आरडाओरडा केल्यानंतर लगेच हल्लेखोराने तेथून पळ काढला. त्यावेळी हल्ल्यात जखमी झालेले विलास मस्के व त्यांच्या बहीण यांना जखमी अवस्थेत रात्री उपचारासाठी दवाखान्यात आणण्यात आले. हॉस्पिटलमध्ये मस्के यांना आणल्यानंतर यांच्या डोक्यात तीन वार, डाव्या हातावर एक वार, असे एकूण पस्तीस टाके डोक्यात पडल्याचे तेथील डॉक्टर यांनी सांगितले आहे. तसेच त्यांच्या बहिणीच्या हातावर देखील एक वार झालेला असून. सध्या विलास मस्के यांची देखील परिस्थिती गंभीर स्वरूपाची असून त्यांच्यावर बीड मधील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनास्थळी पोलिसांनी भेट देऊन स्थळाची पाहणी केली असून. मात्र हा संपूर्ण घडलेला प्रकार बीडमधील कायदा सुव्यवस्थाच्या नावावर खूप मोठी चपराक बसवणारा असून. डायरेक्ट घरामध्ये घुसून पाच ते सहा जणांनी रॉड हत्याराने हल्ला करणे म्हणजे या हल्ल्याची

◆ पान ४ वरून पुढे...

डायरेक्ट चॅलेंज बीड मधील पोलीस यंत्रणाला दिल्याचे नागरिकांतून बोलली जात आहे. बीडचे कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक नवनीत कावत हे बीड मधील गुन्हेगारीचे कंबरडे मोडण्याचा प्रयत्न करत आहेत. परंतु अजून देखील सदर झालेल्या हल्ल्यातून बीड मधील गुन्हेगारी कमी होण्याचे काही नाव घेत नाही. तसेच बीडमधील गुन्हेगार अजून देखील कायद्यासमोर नमले नसल्याचे ही वस्तुस्थिती दाखवून देणाराच हा पालवन गावातील विलास मस्के यांच्यावरील भ्याड हल्ला समजला जातोय. मस्के यांच्यावर घरात घुसून झालेल्या या हल्ल्यामुळे पालवन गावात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून. खाल्लेखोरांना लवकरात लवकर पकडून योग्य तो कायदा करावा. आणि पोलिसी खाकीचा दणका हल्लेखोरांना बीड पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी दाखवून द्यावा. अशी गावकरी, नागरिकांतुन मागणी केली जात आहे. त्यामुळे लवकरात लवकर बीड ग्रामीण पोलीस व पोलिस अधीक्षक कावत यांनी आपली तपास यंत्रणा फिरवून हल्लेखोरांना तात्काळ अटक करावी. अशी सर्व स्तरावर मागणी केली जात आहे.

## आज इम्तियाज ...

मार्गदर्शन लाभणार आहे आहे. तसेच प्रदेश सरचिटणीस समीर साजीद बिल्डर, मा मराठवाडा अध्यक्ष फेरोज लाला, मा जिल्हा अध्यक्ष ॲड शेख शफीक हे सुद्धा मार्गदर्शन करणार आहे, या सभेत मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहान मा तालुकाध्यक्ष शेख ईदरिस पाशा, मा जिल्हा उपाध्यक्ष शेख युसुफ, माजलगाव मतदार संघ प्रभारी सिध्दिख भैय्या यांच्यासह एमआयएम पार्टीच्या वतीने करण्यात आले आहे भारतीय जनता पार्टीचे सरकार अस्तित्वात आल्यापासून जातिवाद मोठ्या प्रमाणात वाढला आहे. जाणून बुजून जाती धर्मात वाद निर्माण केल्या जात आहे. अशा स्थितीत मुस्लिम समाज मन दोलायमान आहे. यावर भाष्य करण्यासाठी ऑल इंडिया मजलीस ए-इत्तेहादुल पार्टीच्या वतीने 'हालात-ए-हजरा' कार्यक्रम ठेवण्यात आला आहे' यानिमित्त शहरातील (आंबेडकर चौक) चुन्नुमा चौक , पावर हाऊस रोड, राजस्थान मंगल कार्यालय येथे रविवार दि. २४ रोजी संध्याकाळी ७ वाजता जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले.

## तलावात बैल...

बैल धुण्यासाठी नेले व ते बैलांना धुवून स्वच्छ करून तळ्या बाहेर आणून सोडले परंतु त्यानंतर स्वत... आंघोळीसाठी बिबिषण सुदाम लोंढे गेले त्यांच्यासोबत त्यांचे दोन नातू लहान लहान सोबत होते परंतु नातू मोबाईलच्या नादात बसलेले होते त्यानंतर आपले आजोबा का दिसत नाही त्यांनी आढावडा केला त्यानंतर गावातील ग्रामस्थ जमा झाले हा प्रकार समोर आला या पाणी जास्त असल्यामुळे व या सिंचन तलावाचा गाळ उपसा करण्यात आला होता दोन ते तीन-तीन परस मोठें खड्डे असल्याची माहिती समोर आली आहे. घटनेची माहिती तलवाडा पोलीस स्टेशनचे सपोनि मनोज निलंगेकर यांना गावकऱ्यांनी दिली तात्काळ घटनास्थळी कर्मचारी दाखल झाले होते. त्यानंतर अग्निशामक दल बीड, गेवराई , यांची टीम दाखल झाली होती सलंग सहा ते सात तास शोधा शोध मोहीम राबवली परंतु अखेर या व्यक्तीचा शोध लागला नव्हता २३ रोजी दुसऱ्या दिवशी तीस तासानंतर बिभिषण सुदाम लोंढे यांचा मृतदेह सापडला आहे. हे मृतदेह सावरगाव येथील भुयरी व्यक्तीने काढला आहे.त्यांच्या कुटुंबात दोन मुली,जावाई,दोन मुल आहेत जातेगाव प्राथमिक आरोग्य केंद्रात सविच्छेदन करण्यात आले अंत्यविधी भेंडटाकळी येथे करण्यात आले आहेत. गावातील नागरिक यांनी मोठी गर्दी केली होती भेंडटाकळी गावात बैल पोळा सण गावकऱ्यांनी साजरा केला नाही लोंढे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असल्याने हळहळ व्ये केली जात आहे.

## शिक्षक – शिक्षकेत्तर...

बदनामीच्या फौजदारी खटल्यात आरोपी म्हणून सामील करण्यात आलेल्या याचिकाकर्त्यांना यामुळे मोठा दिलासा मिळाला. याबाबत हकीगत अशी की, आपल्या विषयाच्या विभागप्रमुखांनी आपलेबाबत अनुचित उद्गार काढले असून त्यामुळे आपला मानसिक छळ झाला असल्याची तक्रार शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयातील एका महिला प्राध्यापिकेने वर्ष २००९ साली महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे सादर केली. सदर घटनेची माहिती समजताच याचिकाकर्ते प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर

◆ पान ४ वरून पुढे...

कर्मचाऱ्यांनी घडल्या प्रसंगाचा निषेध नोंदवणारे एक चार ओळींचे पत्र महाविद्यालयाच्या प्राचार्यांकडे सादर केले. घडलेली घटना ही स्त्रीत्वाचा अवमान असून आपण त्याचा निषेध करतो व संबंधितास कडक शासन व्हावे अशी मागणी करतो असा मजकूर यापत्रात नमूद होता. निषेधाच्या पत्रामुळे आपली बदनामी झाली असून पत्रावर स्वाक्षरी करणाऱ्या सर्व एकोणचाळीस शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना 'बदनामी'च्या गुन्ह्यात दोषी ठरवून त्यांना दोन वर्ष तुरूंगवासाची शिक्षा व्हावी अशी फौजदारी तक्रार प्राध्यापक महोदयांनी २००९ साली प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, संभाजीनगर येथे दाखल केली. त्यात महाविद्यालयातील महिला शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना आरोपी करण्यात आले. त्याविरूध्द आरोपींनी उच्च न्यायालयात दाद मागितली असता उच्च न्यायालयाने खटल्यास स्थगिती देऊन प्रकरण अंतिम सुनावणीकरीता तहकूब केले होते. भारतीय दंड विधान कलम ४९९ मध्ये अब्रुनुकसानी अथवा बदनामीची व्याख्या नमूद असून प्राधिकृत व्यक्तीकडे उचित दाद मागण्यासाठी सादर करण्यात आलेले निवेदन हे बदनामीच्या कक्षेत येत नाही असे कलम ४९९ चा अपवाद क्रमांक आठ सांगतो, स्वतःच्या अथवा अन्य व्यक्तीच्या हितरक्षणार्थ केलेल्या कारवाईस 'बदनामी' ठरवता येणार नाही, असेदेखील कलम ४९९ च्या नवव्या अपवादात नमूद आहे. त्यामुळे सभोवताली घडलेल्या सार्वजनिक घटनेचा सनदशीर मार्गाने निषेध नोंदवणे ही बदनामी ठरू शकत नाही, असा युक्तीवाद अंतिम सुनावणी समयीयाचिकाकर्त्यांच्या वतीने करण्यात आला. तो मान्य करून उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्याविरूध्दचा बदनामीचा खटला रद्द केला. याचिकाकर्त्यांच्यावतीने ॲड चैतन्य धारूरकर यांनी काम पाहिले. त्यांना ड सुभेदार व ड अभिषेक देशपांडे यांनी सहकार्य केले.

## पुण्यात पत्नीकडून....

पत्नीचं नाव आहे. कोमकर दाम्पत्याच्या मृत्यूनंतर त्यांच्या नातेवाईकांचा रुग्णालयावर उपचारात हलगर्जीपणा केल्याचा आरोप केला आहे. हॉस्पिटल आणि तेथील डॉक्टरांनी उपचारात हलगर्जीपणा केल्यामुळेच कोमकर दाम्पत्याचा मृत्यू झाल्याचा गंभीर आरोप नातेवाईकांनी केला आहे. पती कामिनी कोमकर यांनी पती बापू कोमकर यांना स्वतःचं लिव्हर दान केलं होतं. लिव्हर ट्रान्सप्लांटची शस्त्रक्रिया मागील आठवड्यात बुधवारी झाली होती. पती बापू कोमकर यांच्यावर लिव्हर ट्रान्सप्लांटची शस्त्रक्रिया झाली, पण शस्त्रक्रियेच्या लगेचच दोन दिवसांत म्हणजे शुक्रवारी त्यांचा मृत्यू झाला. तर, पत्नी कामिनी कोमकर यांचा बरोबर आठ दिवसांनी म्हणजे आज शनिवारी रुग्णालयात मृत्यू झाला. पती-पत्नीवरील या लिव्हर ट्रान्सप्लांट शस्त्रक्रियेनंतर झालेल्या मृत्यूला डॉक्टर जबाबदार असल्याचा आरोप नातेवाईंनी केला आहे. संबंधित रुग्णालयाचे व्यवस्थापन आणि संबंधित डॉक्टरांवर गुन्हा दाखल करण्याची मागणी कोमकर यांच्या नातेवाईकांनी केली आहे.

## बीडच्या अर्धपीठ....

केली होती. शनी मंदिर देवस्थानचे अध्यक्ष रामनाथ भाऊ खोड यांनी संपूर्ण व्यवस्थेवर बारकाईने लक्ष ठेवत उत्कृष्ट नियोजन केले. त्यांच्या नेतृत्वाखाली शिस्तबद्ध रांग, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची सुविधा, तसेच दर्शनासाठी योग्य मार्गदर्शन देण्यात आले. त्यांच्या अथक परिश्रमामुळे शनी अमावस्येचा हा उत्सव अत्यंत सुरळीत व भव्य स्वरूपात पार पडला. श्री शनिदेवाच्या दर्शनासाठी केवळ बीड जिल्ह्यातूनच नव्हे, तर राज्यभरातून आलेल्या भाविकांनी या दिवशी मंदिरात हजेरी लावली. काही भक्त उपवास करून तर काहींनी तेलाभिषेक, नवग्रह शांती व विशेष पूजा करून शनिदेवाची कृपा मिळवण्याचा प्रयत्न केला. संपूर्ण वातावरण भक्तिभावाने भारलेले असून शनी अमावस्येचा हा उत्सव अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. बीडच्या अर्ध पीठ शनी मंदिराच्या पवित्रतेमुळे हे ठिकाण शनिभक्तांचे एक महत्त्वाचे श्रद्धास्थान बनले आहे.

## संस्था चालकाच्या...

आंदोलन करण्याचा इशाराही टायगर ग्रुप ने दिला होता. वसंतनगर येथील आश्रम शाळेत रुजू झाल्यापासून त्यास प्रचंड मानसिक त्रास व पगार न काढण्याच्या धमक्या देण्यात येत असल्याचे त्याच्या आईने फिर्यादीत म्हटले आहे. परळी तालुक्यातील वसंतनगर तांडा येथील आश्रम शाळेचे

◆ पान ४ वरून पुढे...

संस्थाचालक यांनी त्यास जाणून बुजून काम करताना त्रास देणे, हीन वागणूक देणे, इतर शिक्षक व कर्मचाऱ्यासमोर आपमानास्पद वागणूक देणे, तू केजच्या संस्थाचालकाबरोबर भांडण का केलेस तुझा पगार निघू देणार नाही अशा सातत्याने धमक्या दिल्या. त्यामुळे मयत श्रीनाथ गीते हा सतत तणावातच राहत आला. या सर्व मानसिक तणावातूनच त्याने अखेर राहत्या घरी गळफास लावून आपले जीवन संपवले. त्याच्या आत्महत्येस आश्रमशाळा संस्थाचालक उद्धव कराड व संजय राठोड हे संस्थाचालक जबाबदार असल्याचे फिर्यादीत त्म्हटले आहे. या फिर्यादीवरून परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात या दोन संस्था चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास परळी ग्रामीण पोलीस करत आहेत. मयत श्रीनाथच्या कुटुंबियांनी केलेल्या तक्रारीनुसार, केज येथील सानेगुरुजी निवासी विद्यालयाचे संस्थाचालक उद्धव माणिक कराड आणि परळी तालुक्यातील प्राथमिक आश्रमशाळा वसंतनगर तांडाचे संस्थाचालक संजय परशुराम राठोड यांनी श्रीनाथला नोकरी कायम करण्यासाठी किंवा अनुकंपा तत्त्वावर नोकरी न देण्यासाठी मानसिक त्रास आणि आर्थिक मागणी केली होती. या सततच्या मानसिक छळामुळे आणि आर्थिक अडचणींमुळे श्रीनाथने हे टोकाचे पाऊल उचलले, असे त्यांच्या कुटुंबियांनी पोलिसांना सांगितले. श्रीनाथची आई गंभीर आजाराने त्रस्त असून त्याचे वडीलही शैक्षणिक संस्थेत नोकरी करत असतानाच मृत पावले होते. त्यामुळे कुटुंबाचा संपूर्ण भार त्याच्यावरच होता. संस्थाचालकांविरुद्ध गुन्हा दाखल या प्रकरणी, मयत तरुणाची आई सुनीता गोविंद गिते यांनी परळी ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. पोलिसांनी या तक्रारीच्या आधारे उध्दव माणिक कराड आणि संजय परशुराम राठोड या दोन्ही संस्थाचालकांविरुद्ध भारतीय दंड संहिता कलम १०८, ३५१(२), ३५२, ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक निमोणे करत आहेत.

## मौजे आहेरधानोरा...

आहेर धानोरा वरवटी ग्रुप ग्रामपंचायतच्या सरपंच सौ. मोनिका बालासाहेब इंगोले यांनी आमच्या गावात मोठ्या प्रमाणात देशी-विदेशी दारु विकली जाते. आहेरधानोरा ता. जि. बीड या गावातील पुरुष वर्ग तसेच विद्यार्थी ही दारुमूळे व्यसनाच्या मोठ्या प्रमाणावर बळी पडत आहेत. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत आहे. त्याचप्रमाणे हा पुरुष वर्ग दारुचे सेवन केल्यानंतर घरी गेल्यावर, घरातील महिलाबरोबर वाद । तंटे करीत आहेत. या गावातील दारुमुळे व्यसनी झालेल्या लोकांमुळे शाळेत येणाऱ्या-जाणाऱ्या विद्यार्थीना मोठ्या प्रमाणावर अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यांची कुचंबना होत आहे. त्यामुळे काही विद्यार्थ्यांनी शाळा देखील सोडल्या आहेत. दारुच्या समस्येमुळे सरपंच व २०० महिलांनी ठराव घेऊन त्यामध्ये गावातील सर्व महिलांच्या स्वाक्षरी चे निवेदन, जिल्हाधिकारी, दारूबंदी कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय व महराष्ट्राचे उप मुख्यमंत्री तथा बीडचे पालक मंत्री यांना आहेर धानोरा येथील गावातील दारुची उभी बाटली आडवी करण्यासाठी महिलांचे मतदान घेण्यात यावे व त्यातून दारुची उभी असलेली बाटली आडवी करावी . अशा प्रकारचे निवेदन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित दादांना गावातील महिलांनी दिले आहे. या निवेदनावर तीनशे महिलांनी स्वक्षाऱ्या देखील केल्या आहेत. येत्या पंधरा दिवसामध्ये दारूचे बिअरबारचे लायसन्स रद्द न केल्यास लोकशाही मार्गाने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्च्या काढणार असल्याचे प्रशिद्धी पत्रकात सरपंच सौ. मोनिका बालासाहेब इंगोले यांच्या सह शेकडो महिलांनी इशारा दिला आहे.

## डोळ्यात चटणी...

पोलिसात तक्रार नोंदवली आहे. फिर्यादीत नमूद केल्यानुसार २१ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास घरगुती वादातून संजय चव्हाण यांचा मुलगा अनिकेत याने वडिलांच्या डोळ्यात चटणी टाकून, हातातील वायरने पाठ, अंगावर तसेच पायावर मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादी जखमी झाले असून कानावर व मानेला दुखापत झाली. यावेळी पुतळाबाई सखाराम आडे यांनी मध्यस्थी करून हाणामारी थांबवली. या प्रकरणी अनिकेत संजय चव्हाण याच्यावर ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार राजेंद्र नन्नावरे हे करीत आहेत.

◆ पान ४ वरून पुढे...

## आज लोकनेते...

संचालक तथा मार्गदर्शक आ.प्रकाश दादा सोळंके,जेष्ठ मार्गदर्शक धैर्यशील काका सोळंके यांच्यासह कारखान्याचे व्हा.चेअरमन जयसिंह भैया सोळंके आदि उपस्थित राहणार असून, यावेळी कारखान्याचे सर्व संचालक मंडळ ही उपस्थित राहणार आहेत. याप्रसंगी आमदार प्रकाश दादा सोळंके यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभणार आहे. तरी लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचे सर्व सभासद, ऊसउत्पादक सभासद शेतकरी यांनी या वार्षीक सर्वसाधारण सभेस उपस्थित राहावे.असे आवाहन कारखान्याचे कार्यकारी संचालक आर.सी.बडगुजर, सचिव सुरेश लगड यांनी केले आहे.

## अतिवृष्टीचा मत्स्य....

सोडून माशाचे उत्पादन केले जाते या माशांमुळे अनेकांच्या हाताला काम मिळते. गोरगरीब लोक पोट भरतात तलावातील मासे पकडून ते विक्री केले जातात. या माध्यमातून कुठे रुपयाची उलाढाल होते व गोरगरिबांचा संसार याच व्यवसायाच्या माध्यमातून चालतो, परंतु यावर्षी अतिवृष्टीचा फटका या व्यवसायाला बसला असून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे दि.फिशरमन्स को-ऑप. सोसायटी लि.बीड सोसायटीच्या वतीने बीड तालुक्यातील बिंदुसरा धरण घोडके, राजुरी तलाव व जरूर येथील तलावात मत्स्यबीज सोडण्यात आले होते. या मत्स्य बीजाच्या माध्यमातून मासे तयार होण्याच्या अगोदरच जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली. या अतिवृष्टीमुळे शेती पिकांना ज्याप्रमाणे फटका बसला त्याचप्रमाणे मत्स्य व्यवसायाला ही मोठा फटका बसला आहे मासे मोठे होणे अगोदरच अतिवृष्टीने मत्स्यबीज वाहून गेले आहे. यामुळे सदरील संस्थेला. दि.फिशरमन्स को-ऑप. सोसायटी लि.बीड मोठा फटका बसला असून लाखो रुपयाचे नुकसान झाले आहे. अनेकांच्या संसाराला हातभार लागणार

◆ पान ४ वरून पुढे...

होता परंतु मत्स्यबीज वाहून गेले आणि त्यांच्या हातात चे काम हिरावून घेतले आहे. त्यामुळे सदरील संस्थेला शासनाने आर्थिक मदत करावी असे मागणी संस्थेचे अध्यक्ष अशोक भिवन लुचारे व ईश्वर पाबळे यांनी एका निवेदनाद्वारे केली आहे.

## माय बाप...

आशोक डक म्हणाले की, माजलगाव तालुक्यातील मायबाप जनतेच्या आशीर्वादामुळेच मला आशिया खंडातील सर्वात मोठ्या मुंबई बाजार समितीचा सभापती होण्याचा मान मिळाला आहे. त्यामुळे या जनतेच्या विश्वासाचे ऋण म्हणून माजलगाव तालुक्यात विकासकामांसाठी निधी कमी पडू देणार नाही. आवश्यक निधी आणून तालुक्याचा सर्वांगीण विकास घडवून आणणार आहे.या उद्घाटन कार्यक्रमाला सोन्नाथडीचे सरपंच केरबा तपसे, माजी सरपंच ज्ञानदेवजी वाघमारे, पंचायत समिती सदस्य मिलिंद लगाडे, उपसरपंच विष्णुपंत जिजा गोरे, भाऊसाहेब वगरे, रघुनाथ आप्पा डाके, रामेश्वर घायतिडक,जानकीराम पवार, रत्नेश्वर वाघमारे, महादेवजी वाघमारे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लक्ष्मण वाघमारे, सेवा सहकारी सोसायटीचे संचालक, ग्रामपंचायत सदस्य, महिला व तरुणवर्ग तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अंबाजोगाई शहरातील...

निलेश मुथा सय्यद ताहेर, रशीद भाई, विजय कोंबडे , कु रुपालीची आई या उपस्थित होत्या. या सन्मान सोहळ्या प्रसंगी राजकिशोर मोदी यांनी सर्व गुणवंतांचे कौतुक करत त्यांना पुढील शैक्षणिक उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. अत्यंत बिकट व प्रतिकूल परिस्थितीतही कु रुपाली पळसे हिने अत्यंत जिद्दीने व चिकाटीने आपले शिक्षण घेतले . आज अंबाजोगाई शहरातीलच स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएसच्या

◆ पान ४ वरून पुढे...

सा प्रवेशासाठी पात्र ठरल्याबद्दल कु रुपलीचे विशेष असे कौतुक केले. शहरात सूप व दुरडी बनवण्याचा आपला पारंपरिक व्यवसाय करुन आपला उदरनिर्वाह करणारे शंकर पळसे याची कन्या कु रुपाली ही अंबाजोगाई शहरातील बुरुड समाजातील पहिली डॉक्टर होण्याचा सन्मान मिळवणार आहे. त्याबद्दल संपूर्ण समाजातून देखील तिच्यावर अभिनंदन व शुभेच्छाचा वर्षाव होत आहे. चि विलास जाधव यांच्या कुटुंबात याअगोदर देखील डॉक्टर बनले आहेत. त्याने बी जे मेडिकल कॉलेज मधून आपले एमबीबीएस चे शिक्षण पूर्ण केले आहे . त्यांच्या कुटुंबात डॉक्टर बनण्याची परंपरा पुढे डॉ विलास याने सुरू ठेवली आहे. मुथा कुटुंब हे अंबाजोगाई तालुक्यातील एक प्रतिष्ठित कुटुंब आहे. त्याची कन्या कु साक्षी हिने दंतवैद्यक शास्त्रात पहिल्या वर्षासाठी पहिल्याच फेरीत प्रवेशासाठी पात्र ठरली आहे. या कौतुक सोहळ्यात उपस्थित असलेले जेष्ठ नागरिक माणिक भाऊ कदम यांनी देखील या सर्वांना शुभेच्छा दिल्या. या तिनही विद्यार्थ्यांनी आपल्या परिश्रम, चिकाटी आणि जिद्दीने हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळं केवळ त्यांचे कुटुंबच नव्हे तर संपूर्ण परिसर व समाज अभिमानाने उंचावला असल्याची भावना राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली. या गुणवंत विद्यार्थ्यांचा आदर्श इतर विद्यार्थ्यांनी देखील घेऊन आपल्या कुटुंबासह संपूर्ण समाजाचे नाव उज्वल करावे असे आवाहन देखील इतर विद्यार्थ्यांना राजकिशोर मोदी यांनी याप्रसंगी केले आहे.

## 'माऊली माऊली...

मंदिरापर्यंत ही सवाद्य मिरवणूक आल्यानंतर श्री मन्मथ स्वामी समाधी दर्शन घेऊन तमलूरकर महाराजांनी ४१ व्या अनुष्ठान दरम्यान जमलेल्या भाविक भक्तांना अनमोल असे मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की मन्मथ स्वामी हि कृपा करणारी माऊली आहे स्वामींची आपण मनोभावे सेवा केली तर त्याचे फळ निश्चित संत शिरोमणी मन्मथ स्वामी आपणास देतात .या ठिकाणी

◆ पान ४ वरून पुढे...

जमलेल्या चार राज्यातील भक्तगणांच्या असंख्य संख्येवरून असे दिसते की प्रत्यक्ष भगवान मन्मथ स्वामी महाराज यांनी आपल्या भक्त गणावर कृपाशीर्वाद केला आहे व त्यांच्या मनातील इच्छा पूर्ण केल्या आहेत, त्यांच्या सेवेचे फळ त्यांना मिळालं त्यामुळेच हा असंख्य जन समुदाय गेल्या एक महिन्यापासून या ठिकाणी आपली सेवा करत आहेत

## पीक विमा...

संदर्भाने स्थानिक आपत्तीचा निकष बदलल्याने शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. पीक विमा म्हणजे शेतकऱ्यांचे सुरक्षा कवच समजले जात होते. पूर्वी विमा योजनेत ४ ट्रेगर होते - सलग ३ आठवडे पावसाने दडी मारली आणि पिके करपली, अतिवृष्टीमुळे पिके वाहून गेली, पिके पाण्यात बुडून नासली, तक्रारीनंतर पंचनामा करून २५ टक्के अग्रिम दिले जात असे. यामुळे शेतकऱ्यांचा खर्च निघत असल्याने दिलासा मिळत असे. पण विमा कंपन्यांनी सत्ताधाऱ्यांना हाताशी धरून अतिवृष्टी व कोरडे ट्रेगर वगळून फक्त पीक कंपनी हा एकमेव ट्रेगर ठेवला आहे. वांझोट्या पंचनाम्याचा शेतकऱ्यांना उपयोग काय? या आठवड्यात जिल्ह्यात पावसाने घातलेल्या धुमाकूळामुळे शेकडो हेक्टरवरील खरीप पिके उद्ध्वस्त झाली आहेत. शेतकरी या नुकसानीचे फोटो काढून तक्रार करत आहेत. मात्र हे ट्रेगरच उपलब्ध नसल्याने या तक्रारीचा काहीही उपयोग होणार नाही. मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पंचनामे करून अहवाल पाठवण्याच्या सूचना केल्या असल्या तरी मागचा अनुभव लक्षात घेता, शासनाची मदत केव्हा मिळेल याचा नेम नाही. त्यामुळे या वांझोट्या पंचनाम्याचा शेतकऱ्यांना काहीही उपयोग नाही. शेतकऱ्यांची मागणी- सध्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. संकटाच्या काळात नियमित व हक्काची मदत मिळावी यासाठी पीक विमा कंपनीचे ट्रेगर पूर्वीप्रमाणेच सुरू करावेत, अशी ठाम मागणी डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# पवित्र बैलपोळा निमित्ताने अंजनवतीत अवघाची रंग एक जहाला



**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील बालाघाट परिसरातील अत्यंत जागृत, सुसंस्कृत,सामाजिक बांधिलकी जोपासणारे गाव अशी अंजनवतीची संपूर्ण बीड जिल्ह्यात ओळख आहे काल कृषी संस्कृतीशी निगडित सांब सदाशिवाच्या नंदीबैलाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारा शेतकरी कष्टकरी बांधवांसाठी आनंदी सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला काही वर्षांपूर्वी गावात मानपानावरून भांडण तंटे होत असत मात्र अत्यंत शांत, संयमी व अंजनवती गावचे प्रदीर्घकाळ सरपंचपद भूषविणारे स्वर्गीय बन्सीधर येडे पाटील तथा भाऊ यांनी समन्वयातून हा प्रश्न कायमचा सोडविला तेव्हापासून गावातील विविध मंडळे आपापली





स्वतंत्र भव्य मिरवणूक काढून आनंद साजरा करतात पोळा सणाचा परंपरागत मान श्री संत तुकाविप्र महाराज पालखी प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा दिंडीचालक अर्जुन महाराज पाटील परिवाराकडे असून या व्यतिरिक्त गावातील आंबराईवाडा मंडळ, वरवाडा मंडळ, आपकाई मंडळ, बापू येडे मंडळ, सटवाई मंडळ, पोलीस पाटील मंडळ,सोनवणे मंडळ, मिरवणुकीत मुस्लिम बांधवांना त्यांच्या बैलांसह सहभागी करून हिंदू मुस्लिम एकतेचे दर्शन घडवणारे माळवाले मंडळ ही सर्व मंडळे पारंपारिक वाद्य व बँडच्या गजरात मिरवणुकीत सहभागी होतात अंजनवती गावच्या पोळा सणाला वैभव व व्यापक स्वरूप प्राप्त करून देण्याचे काम माजी सैनिक स्व.भालचंद्र पाटील अंजनवतीकर तथा काका यांनी केलेले आहे यावेळी सर्वत्र उत्साहाचे वातावरण पहावयास मिळाले थेट मुंबई पुण्यापासून बाहेरगावी विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या मान्यवर व्यक्तींनी पोळा सणानिमित्त आपल्या मूळ गावी येऊन सहभाग नोंदविला यामधे सतत सामाजिक चळवळीत सहभाग नोंदविणारे आम आदमी पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष तथा बीड नगरपालिकेचे भावी नगरसेवक अशोक येडे पाटील,डॉ.विजय पाटील अंजनवतीकर, छत्रपती राजश्री शाहू महाराज बँकेचे व्यवस्थापक संदिपान येडे पाटील, मुख्याध्यापक पुरुषोत्तम येडे पाटील, गोवर्धन जाधव पाटील सर,राष्ट्रीय समाज पक्ष बीड तालुकाध्यक्ष प्रा.बाबासाहेब सापनकर,मुंबई बेस्टबस कामगार नेते इस्माईल पठाण,पाटोदा आगाराचे वरिष्ठ लिपिक राजेश येडे पाटील (प्रभुजी), एसटी कामगार सेनेचे श्रीकांत येडे पाटील, अशोक रामकिसन येडे पाटील सर, परिवहन विभागातील शिवकल्याण मोरे पाटील, संभाजीनगर येथील प्रसिद्ध व्यावसायिक सखाराम विश्वनाथ येडे पाटील, बँक कर्मचारी सागर जोशी, संदीपान सोनवणे फौजी, सामाजिक कार्यकर्ते रफिक पठाण अंजनवती हायस्कूल अंजनवतीचे आदर्श शिक्षक ईश्वर नाना येडे पाटील व इतर बाहेरगावी काम करणाऱ्या अनेकांनी गावी येऊन सहभागी होत बैलांचे पूजन केले हिंदू, मुस्लिम,बौद्ध या सर्व समाज घटकातील शेतकरी बांधवांनी पोळा मिरवणुकीत सहभाग नोंदविल्यामुळे खऱ्या अर्थाने अंजनवती येथे अवघाची रंग एक झाल्याचा प्रत्यय गावकऱ्यांनी अनुभवला या पवित्र आनंदी सोहळ्याला कोणत्याही प्रकारे गालबोट लागू नये व आपली परंपरा उत्साहात व सौदाह्यपूर्ण वातावरणात पार पडावी यासाठी शिवभिम विचार मंचाचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांनी पूर्ण वेळ मिरवणुकीत सहभाग नोंदवुन कसल्याही प्रकारच तंटा किंवा गोंधळ न करता हा सण साजरा केल्याबद्दल गावकऱ्यांचे आभार व्यक्त केले थोरात कंपनीच्या उत्कृष्ट बँडमुळे कार्यक्रमाला रंगत आली नेकनुर पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या लिंबागणेश दुरक्षेत्राचे कर्तव्यदक्ष जमादार बाबासाहेब राख व होमगार्ड ढास साहेबांनी भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला !!!!!



*महाराष्ट्रातील बळीराजाची आन बाण शान असणारा पोळा सन राज्यभरात ऊत्साहत साजरा करण्यात आला. गेवराई तालुक्यात देखील पारंपरिक पध्दतिने हर्ष उल्लासित वातावरणात ठिक ठिकाणी सर्जा राजाची वाजत गाजत मिरवणुक काढत पोळा सन साजरा झाला. दरम्यान गेवराईचे गटविकास अधिकारी अनिरुद्ध सानप यांनी शिरुर येथे आपल्या निवासस्थानी मुळगावी कुटुंबीयांसोबत सर्जा-राजांचे पुजन करुन बळीराजाला शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांच्यासमवेत कुटुंबातील सदस्य बाजीराव सानप, गणेश सानप, बाळासाहेब सानप सह संपूर्ण सानप परिवार उपस्थित होता.*

# हर हर महादेव.... चाहूर चाहूर चांगभलं... घोषणांनी 'कृषीकुल' परिसर दुमदुमला

## पारंपारिक पद्धतीने बैलपोळा सण उत्साहात साजरा

**सिरसाळा । प्रतिनिधी**

जलनायक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनात स्थापन करण्यात आलेल्या कृषीकूल येथे बैलपोळा सण अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. पारंपरिक पद्धतीने सर्जा राजाला सजवण्यात आले होते. कृषीकूल परिसरातील



कृषी महादेव मंदिर येथे मिरवणूक काढून त्यांना दर्शनासाठी आणण्यात आले व तद्नंतर विधिवत पूजा करून पुरणपोळीचा नैवेद्य भरवण्यात आला. उपस्थित सर्व कृषीकूल परिवारातील सदस्यांनी हर हर महादेव.... चाहूर चाहूर चांगभला... पाऊस आला चला घराला... आदी घोषणांचा गजर केल्याने संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.

वर्षभर शेतात राबणाऱ्या सर्जा-राजाबद्दल ऋण व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे बैलपोळा सण. सिरसाळा जवळच असलेल्या कृषीकुल येथे बैलपोळा हा सण मोठ्या उत्साहात पारंपारिक पद्धतीने साजरा करण्यात आला. यंदा चांगले पर्जन्यमान राहिल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. कृषीकुल मधील गोशाळेत असलेल्या बैलांसह इतर गायी, वासरे यांना नवी वेसण, घुंगरमाळा, पैंजण, म्होरकी, घाटी, झूल व गोंडे असे विविध प्रकारचे साहित्याने सजवण्यात आले होते. कृषीकूल परिवारातील सर्व सदस्यांनी या उत्सवात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.



*मौजे.तांदळवाडी येथे श्री. सिद्धेश्वर सांगूळे कुटुंबासह बैलपोळा साजरा करताना.*



*वडवणीचे उपनगराध्यक्ष बन्सी भाऊ मुंडे यांनी देखील त्यांच्या राहत्या घरी कुटुंबासामावेत बैलपोळा साजरा केला.*



*जेष्ठ नेते सोमनाथ भाऊ बडे उपसरपंच मयुर बडे व सहपरिवार व मित्र परिवारासहीत बैल पोळा साजरा केला.*

# सौ.के.एस.के.महाविद्यालयात विद्यापीठ वर्धापन दिन उत्साहात साजरा

**बीड । प्रतिनिधी**

सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या प्रांगणात २३ ऑगस्ट २०२५ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर



मराठवाडा विद्यापीठाचा वर्धापनदिन नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहन नंतर संगीत विभागाच्या वतीने विद्यापीठ गीत गाऊन विद्यापीठ वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, संस्थेचे प्रशासकिय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशमाने, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर, पदव्युत्तर संचालक डॉ.ए.एस.खान,कमवि उपप्राचार्य एन.आर.काकडे , पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर ,डॉ. भागचंद सानप तसेच एनसीसी कॅप्टन डॉ.बालासाहेब पोटे व त्यांच्या सर्व कॅडेटनी सहभाग घेतला.

## श्री.१०८ प.पू.ष.ब्र शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांचे अमृत उपदेश

**बीड । प्रतिनिधी**

आपल्या जीवनामध्ये गुरुचे स्थान हे उच्चतम स्थान आहे .गुरुच्या अनुग्रहा शिवाय भगवंतप्राप्ती होत नाही. गुरु अनुग्रह देतात व आपल्या जीवनातील अंधकार दूर करतात गुरुच्या आशीर्वादा वरच भगवंताची प्राप्ती होते असे अनमोल विचार श्री. १०८ प.पू.ष.ब्र शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांनी दत्त संस्थान बालाघाट कपिलधारवाडी येथे आयोजित शिष्यांना उपदेश पर प्रवचनामध्ये अनमोल विचार प्रतिपादित केले. आपल्या प्रवचन सेवेमध्ये प.पू.ष.ब्र. शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांनी गुरु सेवा ,भगवंत सेवा व आपल्या जीवनात गुरुचे अनन्य महत्त्वाचे स्थान आहे हे सांगताना महाराजांनी श्रोत्यांना ज्याप्रमाणे मातीचा माठ बनवण्यासाठी मातीची गरज आहे., सोन्याचे दागिने बनवण्यासाठी सोन्याची गरज आहे



*युवा उद्योजक रवी लांडे व लांडे परिवारातर्फे बैल पोळा साजरा करण्यात आला यावेळी लांडे परिवार व कदम परिवार उपस्थित होते.*

# निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे परळीतील प्रभाग रचना करा: बालाजी जगतकर

**नवीन प्रभाग रचना करण्यासाठी नगर परिषदेतकडे आक्षेप, हरकती नोंदवा ; शहरातील अनेक वस्त्यांचे विभाजन करून जुनी प्रभाग रचना**

**परळी । प्रतिनिधी**

परळी शहरातील सर्वच मागासवर्गीय वस्त्यांची विभाजन करून जुनी प्रभावी रचना केली आहे. ती बदलून नवीन प्रभाग रचना करा त्यामध्ये प्रामुख्याने भिमनगर, जगतकर गल्ली, प्रबुद्ध नगर, रोडे गल्ली ताटे गल्ली आरोग्य गल्ली, रमानगर, या वस्ती आहे अनुसूचित जातीच्या आहेत. त्या भागाचे विभाजन टाळून अनुसूचित जातीच्या प्रभागात समावेश करावा यासाठी जवळपास १०० पेक्षा जास्त मतदारांनी व या भागात राहणाऱ्या लोकांनी हरकती, आक्षेप नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्याकडे नोंद करायला सुरुवात केली आहे. व आक्षेपी व हरकती नोंद सुरूच आहेत ३१ ऑगस्ट पर्यंत त्या नोंदवल्या जाणार आहेत.

या अगोदर देखील दि. १९/६/२०२५ या तारखेला निवेदन दिलेली आहे. अनुसूचित जाती या समाजाचा असल्यामुळे दलित वस्ती व इतर योजनेपासून वंचित ठेवत आहात प्रभाग क्रमांक पाच (५) गणेशपार, कालरात्री देवी मंदिर परिसर, यात आपण जगतकर गल्ली, गणेश पारपरिसर, काळाराम मंदिर परिसर, व आंबेवेस



या प्रभागात अनुसूचितजाती लोकसंख्या ६५७, अनुसूचित जमातीची लोकसंख्या ०६, व प्रभाग क्रमांक १६ या प्रभागात आपण अनुसूचित जाती लोकसंख्या ५७७, अनुसूचित जमाती ७६ लोखसंख्या आहे. या दोन प्रभागाची अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीची लोकसंख्या एकत्र केल्यास १२०० आहे तेव्हा या निवेदनावर माझा असा आरोप आहे की आपण प्रभाग क्रमांक ५. प्रभाग क्रमांक ६ या दोन्ही प्रभागाचे मते विभागून आपण कोणा तरी राजकीय पक्षाला मदत करत आहात. आपणास पुनश्च विनंती आहे की निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशाप्रमाणे म्हणजे वार्डाची लोकसंख्या ही अध्यांपेक्षा जास्त अनुसूचित जातीची असावी, व ५.५.३ प्रभाग रचना मार्गदर्शन तत्त्व ५.५.३ व अनुसूचित जाती ऑब्लिक अनुसूचित जमाती यांच्या वस्तीचे शक्यतोवर विभाजन होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी असे निर्देश निवडणूक निर्णय अधिकारी मुंबई यांनी दिलेले असतानाही परळी नगरपालिका प्रशासन, परळी निवडणूक अधिकारी व प्रस्थापित राजकीय नेते आमदार, खासदार यांच्या सांगण्यावरून त्यांचे त्यांच्या सोयीप्रमाणे प्रभाग रचना करत आहेत व केली आहे. यामुळे राजकीय अन्याय तर होतच आहे पण आमच्या अधिकाऱ्यापासून आम्हास वंचित ठेवत आहात. नगरपालिका प्रशासन व प्रस्थापित राजकीय नेते यांनी संगणमत करून जाणीवपूर्वक अशी प्रभाग रचना केली आहे. अनुसूचित जातीच्या वाडांचे विभाजन प्रभाग क्रमांक ०४ प्रभाग क्रमांक ०५ प्रभाग क्रमांक १६ यातील प्रभाग रचनेत केलेले आहे. तेव्हा सदरील प्रभाग रचना पुन्हा करून अनुसूचित जाती व जमातीचा प्रभाग एक करावा अन्यथा आपल्या विरोधात आम्हाला कायदेशीर व सनदशीर मागने न्यायालयात याचिका दाखल करणार आहोत. न्याय न मिळाल्यास कायदेशीर लढाई देखील लढली जाणार आहे.



*राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे तालुकाकाध्यक्ष महादेव जमाले, दत्तात्रय जमाले, आत्माराम जमाले जमाले परिवारातर्फे बैल पोळा साजरा करण्यात आला.*



*गवळी परिवारानी गवळी फार्म येथे सहकुटुंबसहीत बैल पोळा साजरा केला.*

# मांजरसुंबातून जरांगे पाटील सरकारला काय इशारा देणार ?

## आज जरांगे पाटलाच्या उपस्थितीत मांजरसुंबा चौकात मराठा समाजाची इशारा बैठक



बीड । प्रतिनिधी

मराठा आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील यांच्यासह समाज बांधव दि. २७ ऑगस्ट रोजी मुंबईकडे कूच करणार आहेत. दि.२९ ऑगस्टला मुंबईत दाखल होण्याच्या अनुषंगाने मराठा समाज बांधवांकडून जोरदार तयारी सुरू आहे. दरम्यान मुंबईला निघण्यापुर्वी मराठा योध्दा मनोज जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत आज रविवार दि.२४ ऑगस्ट रोजी मांजरसुंबा तालुका बीड येथील चौकात अंतीम निर्णायक बैठक घेण्यात येणार आहे. बैठकीची तयारी पूर्ण झाली असून बैठकीचे नाव इशारा बैठक असले, २९ ऑगस्ट च्या आंदोलनाच्या दृष्टीने ही तयारी करण्यात येत आहे. या बैठकीतून मनोज जरांगे पाटील सरकारला काय इशारा देतात? याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. मांजरसुंबा येथे आज होणाऱ्या बैठकीसाठी जिल्हाभरातील सर्व मराठा सेवक, समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत, मुंबईला निघण्यापुर्वी होणाऱ्या बैठकीत जरांगे पाटील समाजाला काय आवाहन करतात ? मुंबईतील आंदोलनाच्या पाश्र्वभुमीवर राज्य सरकारने मंत्र्यांची उपसमिती गठीत केली आहे. याबाबत जरांगे पाटील काय बोलतात ? याकडेही राज्याचे लक्ष लागलेले आहे.

# अतिवृष्टीचा मत्स्य व्यवसायालाही फटका; नुकसान भरपाई देण्याची मागणी

● अशोक भिवन लुचारे, ईश्वर पाबळे यांची निवेदन

बीड । प्रतिनिधी

तालुक्यातील घोडका राजुरी, जरुड, बिंदुसरा धरण या तलावात दि.फिशरमन्स को-ऑप. सोसायटी लि.बीड मत्स्य को-ऑपरेटिव्ह सोसायटीच्या वतीने मत्स्यबीज टाकण्यात आले होते परंतु अतिवृष्टीमुळे हे अतिवृष्टीने



बीज वाहून गेले असून संस्थेला मोठा फटका बसला आहे. त्यामुळे सदरील संस्थेला नुकसान भरपाई देण्यात यावी असे मागणी संस्थेचे अध्यक्ष अशोक भिवन लुचारे व ईश्वर पाबळे यांनी एका निवेदनाद्वारे केली मागणी आहे. बीड तालुक्यात अनेक वर्षापासून दि.फिशरमन्स को-ऑप. सोसायटी लि.बीड सोसायटी काम करत आहे. या संस्थेच्या माध्यमातून तलावात मत्स्यबीज ▶▶ उर्वरित पान २ वर



*पिंपळनेर परिसरात चंदन चोरांचा सुळसुळाट : पिंपळनेर पोलीस स्टेशनंच्या हद्दीतील चांदणचोर राज रोज अशा प्रकारे चंदनची झाडे तोडत आहेत. याकडे वनविभागाने देखील डोळा झाक केल्याचे परिसरातील नागरिक बोलत आहेत.*

# माय बाप जनतेच्या आशीर्वादामुळे मी नवी मुंबईपर्यंत पोहोचलो : मा.सभापती आशोक डक

## सोन्नाथडी येथे पेव्हर ब्लॉक व सिमेंट रस्त्याचे उद्घाटन



माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील सोन्नाथडी येथे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातील पेव्हर ब्लॉक व गावाअंतर्गत सिमेंट रस्ता या दोन विकास कामांचे उद्घाटन मा. सभापती अशोक आबा डक (मा. कृषी उत्पन्न बाजार समिती, मुंबई) यांच्या हस्ते शनिवारी सकाळी ११ वाजता करण्यात आले. यावेळी बोलताना ▶▶ उर्वरित पान २

# अंबाजोगाई शहरातील गुणवंतांचा राजकिशोर मोदी यांच्या कडून सन्मान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील डॉ विलास दत्ता जाधव याने NEET PG मध्ये भारतात १७४६ वा रँक तसेच ८०० पैकी ६१५ गुण मिळवत एमबीबीएस नंतरच्या PG साठीच्या प्रवेशास पात्र ठरल्यामुळे तसेच कु. रूपाली शंकर पळसे हिने देखील NEET परीक्षा उत्तीर्ण होऊन स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश निश्चित केल्याबद्दल, त्याचबरोबर अंबाजोगाई शहरातील सुप्रसिद्ध व्यापारी निलेश मुथा यांची सुकन्या



कु साक्षी हिने BDS च्या पहिल्या राऊंडमध्येच नाशिक येथील डेंटल कॉलेजमध्ये आपला प्रवेश निश्चित केला आहे. याबद्दल या तीनही गुणवंतांचा फेटा बांधून तसेच शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान व सत्कार करण्यात आला.यावेळी राजकिशोर मोदी यांच्या सोबत शहरातील जेष्ठ नागरिक तसेच विविध चळवळीतील अग्रणी माणिकभाऊ कदम , दत्ता जाधव, ▶▶ उर्वरित पान २ वर

# 'माऊली माऊली गुरुराज माऊली'च्या जयघोषात भव्य शोभायात्रा

## मन्मथ स्वामी म्हणजे श्रद्धा विश्वास व सेवेचे फळ देणारी माऊली-सद्गुरु शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर

बीड । प्रतिनिधी

श्री क्षेत्र पावन भूमी कपिलधार हे महान संत शिरोमणी व भक्तांची इच्छा व अपेक्षा पूर्ण करणारी माऊली म्हणजे मन्मथ स्वामी महाराज हे आहेत असे उद्गार शिवानंद शिवाचार्य महाराज तमलुरकर यांनी ४१ व्या अनुष्ठानाच्या सांगता प्रसंगी आपले विचार व्यक्त केले .

सद्गुरु शिवानंद शिवाचार्य तमलूरकर महाराज यांचे ४१ अनुष्ठान दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी संपन्न झाले या अनुष्ठान सांगता प्रसंगी मनोगत व्यक्त केले, यावेळी भक्तगणांनी महाराजांची



भव्य दिव्य अश्वारूढ शोभायात्रा काढण्यात आली होती .या शोभा यात्रेमध्ये महिलांनी फुगड्यांचा आनंद घेतला ,याबरोबरच मन्मथ स्वामी महाराजांच्या नामाचा गजर करत श्री मन्मथ मुक्तिधाम मठापासून मन्मथ स्वामी ▶▶ उर्वरित पान २ वर

**● गुरुमाऊली हे कल्पवृक्ष आहेत आपले इच्छित फळ देण्यासाठी ते सदैव भक्तांच्या पाठीशी उभे असतात फक्त आपण मनोभावे त्यांची सर्वांनी सेवा केली पाहिजे.**

**गुरुमाऊलीच्या सानिध्यात येऊन त्यांची सेवा करणे हे प्रत्येकाचे कर्तव्यच आहे गुरुच्या आशीर्वाद लाभल्या शिवाय आपल्या जीवनात आनंद समाधान व यश हे मिळत नाही गुरुचा कृपा आशीर्वाद मिळाला की आपले जीवन आनंदी होतेच.- विश्वनाथ आप्पा स्वामी, मन्मथ स्वामी देवस्थान पुजारी, कपिलधार**

# पीक विमा कंपन्यांचे दलाल सरकारच शेतकऱ्यांच्या मुळावर

## स्थानिक आपत्तीचा निकष वगळल्याने २५ टक्के अग्रीम नुकसानभरपाई बंद ; पुर्वीप्रमाणेच ट्रेगर करण्यात यावेत : डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

अगोदरच पीक विमा कंपनीकडून शेतकऱ्यांना विमा भरपाई देण्यात चालढकल होत असतानाच, पीक विमा कंपन्यांचे दलाल झालेले राज्य सरकार शेतकऱ्यांच्या मुळावर उठले आहे. पीक विमा योजनेतून नुकसानभरपाईसाठी पात्र असलेले स्थानिक आपत्तीमुळे झालेले



नुकसान, काढणीपूर्व किंवा काढणीनंतर झालेले नुकसान, पेरणी न झाल्याने झालेले नुकसान हे महत्वाचे निकषच वगळण्यात आले आहेत.

यामुळे शेतकऱ्यांनी तक्रार केल्यानंतर पंचनामा करून मिळणारी २५ टक्के अग्रीम रक्कम आता मिळणार नाही. सरकारने नुकसानीची पाहणी करून पंचनामे करण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाला दिल्या असल्या तरी स्थानिक आपत्तीचे ट्रेगर रद्द केल्याने आठवडाभरात झालेल्या नुकसान भरपाईची मागणी पीक विम्यातून होणारच नाही. त्यामुळे सरकारने संकटाच्या काळात नियमित हक्काची मदत २५ टक्के अग्रिम देण्यासाठी पुर्वीप्रमाणेच ट्रेगर सुरू करावेत, अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि कृषीमंत्री यांना करण्यात आली असून सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

शासनाचा बदललेला निकष - शेतकरी हवालदिल

राज्य शासनाने पिक विम्याच्या ▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### आज लोकनेते सोळंके कारखान्याची ३६ वी वार्षीक सर्वसाधारण सभा



माजलगाव । प्रतिनिधी

लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याची सन २०२४-२५ या आर्थिक वर्षांची ३६ वी वार्षीक सर्वसाधारण सभा आज दि.२४ ऑगस्ट रोजी रविवार दुपारी१ वा.आयोजित करण्यात आली आहे. तरी या सर्वसाधारण सभेस कारखान्याचे सर्व सभासद, ऊस उत्पादक सभासद शेतकरी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.असे आवाहन कार्यकारी संचालक आर.सी.बडगुजर,सचिव सुरेश लगड यांनी केले आहे. तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना मराठवाड्यातील नामांकित व स्थापनेपासुन अविरत गाळप हंगाम करणारा साखर कारखाना असुन, या कारखान्याचा गाळप हंगामाचा एकही खंड पडलेला नाही.हा कारखाना म्हणजे ऊस उत्पादक शेतकरी,ऊसतोड मजुर,मुकादम यांची कामधेनु म्हणुन ओळखला जातो.या कारखान्याने ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या ऊसाला रास्त भाव देत कायम शेतकऱ्यांचे हित जोपासले आहे.अशा सर्वांचा आर्थिक कणा असलेल्या लोकनेते सोळंके कारखान्याची सन २०२४-२५ या आर्थिक वर्षांची ३६ वी वार्षीक सर्वसाधारण सभा दि.२४-०८-२०२५रविवार रोजी दुपारी १ वा.कारखाना कार्यस्थळावर आयोजित करण्यात आली.या सभेच्या अध्यक्षस्थानी चेअरमन विरेंद्र दादा सोळंके राहणार आहेत. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून कारखान्याचे जेष्ठ ▶▶ उर्वरित पान २ वर

### महिलांच्या सुरक्षेसाठी आशा कार्यकर्त्यांना वन स्टॉप सेंटर(सखी केंद्र) विषयी माहिती देवून जनजागृती कार्यक्रम उत्साहात साजरा!

बीड । प्रतिनिधी

साक्षारप्रीपी ता.जि बीड येथे आशा कार्यकर्त्यांच्या मासिक बैठकीच्या दिवशी कार्यक्रमाचे नियोजन करून महिलांच्या हक्क व सुरक्षेसाठी महत्त्वाची ठरणारी वन स्टॉप सेंटर (सखी केंद्र) योजना याबाबत आशा कार्यकर्त्यांना माहिती देऊन जनजागृती कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. वन स्टॉप सेंटर ही महिलांसाठी सर्व प्रकारच्या मदतीचे एक केंद्र आहे. या केंद्रामार्फत कोणाला मदत मिळते? तर घरगुती हिंसा, लैंगिक छळ, छेडछाड, बलात्कार, मानवी तस्करी, मालमत्तेवर हक्क, जबरदस्तीचे लग्न किंवा कोणत्याही प्रकारच्या अन्यायाला बळी पडलेल्या अशा प्रसंगी महिलांना एकाच छताखाली तात्काळ वैद्यकीय मदत ,पोलीस व कायदेशीर मदत,समुपदेशन (काउंसिलिंग) तात्पुरते निवासस्थान, पुनर्वसनासाठी मार्गदर्शन अशा सुविधा मिळतात.सर्वात महत्त्वाचे म्हणजे या सर्व सेवा मोफत आहेत व कोणत्याही महिलेला, दिवसरात्र, २४ तास उपलब्ध आहेत. तसेच महिला हेल्पलाईन (१८१) व बाल संगोपन योजना विषयी माहिती देऊन या जनजागृती उपक्रमात आशा कार्यकर्त्यांना ग्रामीण व शहरी भागातील महिलांपर्यंत ही माहिती पोहोचविण्याचे आवाहन करून कार्यकर्त्यांना केंद्राबद्दल माहितीपत्रके देण्यात आले व गावोगावच्या महिलांना या केंद्राविषयी माहिती देऊन त्यांना आवश्यक मदत मिळावी यासाठी सक्रीय भूमिका बजावण्याचे आवाहन कु.कदीरा शेख (वैद्यकीय सहाय्यक) व कु.प्रियंका भद्रे (केस वर्कर) यांनी केले. या उपक्रमामुळे ग्रामीण भागात महिलांना मदतीची माहिती सहज उपलब्ध होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केले.

### पाझर तलावात बुडून शेतकऱ्याचा मृत्यू

बीड । प्रतिनिधी

यावर्षी बीड जिल्ह्यात सर्व मंडळामध्ये संततधार पाऊस झाल्याने नदी,नाले,पाझर तलाव तुडुंब भरले असल्याने शेतकरी सुखावला आहे. पोहण्यासाठी पाझर तलावात उतरलेला शेतकरी बुडाला असल्याची घटना शुक्रवार (दि. २२) सकाळी ११:३० वाजण्याच्या सुमारास भेंडटाकळी (ता. गेवराई) येथे घडली असून, गावातील ग्रामस्थांनी लोंढे यांना शोधण्याचा प्रयत्न केला होता,परंतु शोध करून देखील सापडत नसल्याने बीडच्या अग्निशमन दलाला याची माहिती दिली असता तत्काळ बीड अग्निशामक दलाचे कर्मचारी घटनास्थळी पाझर तलावात जाऊन शोधकार्य सुरू केले होते.परंतु रात्री उशिरापर्यंत लोंढे यांचा शोध लागला नव्हता. बिभीषण सुदाम लोंढे (वय ५३ वर्ष) रा. भेंडटाकळी (ता. गेवराई) असे पाझर तलावात बुडालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. गेवराई तालुक्यातील भेंडटाकळी गट क्रमांक १७३ मध्ये असलेल्या पाझर तलावात पोहण्यासाठी लोंढे उतरले होते. यावेळी ते तलावात बुडाले असल्याची माहिती गावकऱ्यांना मिळाल्याने शोध घेऊन ही सापडत नसल्याने ग्रामस्थांनी याची प्रशासनाला माहिती दिली. प्रशासनाने शोध घेण्यासाठी बीड नगरपरिषदेच्या अग्निशमन दलाच्या जवानांना पाचारण केले आहे. शोध बचाव टीमचे अधिकारी किशोर जाधव, कृष्णा जंगले, अनिकेत कपाळे, ओंकार राठोड, विष्णू बांगर यांनी शोध सुरू केला आहे. पण शनिवारी दुपारी १२:३० पर्यंत यश आले नव्हते ही घटना समजताच ग्रामस्थांनी पाझर तलावावर मोठी गर्दी केली. परंतु आज सकाळी बारा वाजण्याच्या सुमारास प्रेत पाण्यावर तरंगत असतानाचे काही गावकऱ्यांनी दिसले, गावकरी व अग्निशामक दल कर्मचाऱ्यांनी प्रेत पाण्याबाहेर काढले.

### याकूब तांबोळी यांचे निधन

आष्टी । प्रतिनिधी

जुन्या पिढीतील शिक्षक याकूब तांबोळी सर यांचे दि. २१ रोजी पुणे येथे उपचारदरम्यान निधन झाले. त्यांचा दफनविधी कार्यक्रम दि. २२ ऑगस्ट २०२५ सकाळी आठ वाजता जामखेड येथे कब्रस्तानात करण्यात आला. रयत शिक्षण संस्थेमध्ये वरिष्ठ सहाय्यक म्हणून त्यांनी खर्डा जामखेड राशीन येथे उल्लेखनीय काम केले होते. पेन्शनरचे कोणत्याही प्रकारचे रयत शिक्षण मधील असणारे काम निवृत्तीनंतरही ते करत होते.



त्यांच्या निधनाने जामखेड परिसरामध्ये हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. शैक्षणिक कामाच्या व्यतिरिक्त ते धार्मिक कामातही अग्रेसर होते. त्यांनी २००४ मध्ये मक्का येथे जाऊन हज यात्रा पूर्ण केली त्याचप्रमाणे दक्षिण आफ्रिका इंडोनेशिया मलेशिया अशा विविध देशांचा प्रवास धार्मिक कामानिमित्त त्यांनी केला. वयाच्या ८० व्या वर्षी यांना देवाज्ञा झाली. त्यांच्या दुःखद निधनामुळे जामखेड परिसरामध्ये शोककळा पसरली. अंत्यविधी समयी त्यांचे रयत शिक्षण संस्थेचे कार्यरत व माजी कर्मचारी पदाधिकारी उपस्थित होते त्यामध्ये संस्थेचे मधुकर आबा राळेभात, शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन मारुती पठाडे सर, मौलाना खलील शामीर भाई, आष्टी पाटोदा, जामखेड परिसरातील शिक्षक बांधव नातेवाईक उपस्थित होते.